# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २३/०५/२०१७

## आलापल्ली येथे नक्षल समर्थक तीन तेंदूपत्ता ठेकेदारांना ७५ लाख रोकड सह अटक

काल दिनांक २२/०५/२०१७ रोजी विशेष अभियान पथक प्राणहिताचे पोउपनि श्री. मिलन कुरकुटे व त्यांचे पथक हे नक्षलविरोधी अभियान राबवून परत येत असतांना रात्री ०१.३० वा. च्या दरम्यान त्यांना मौजा आलापल्ली येथे विना नंबर एक नवी चारचाकी वाहन संशयितरित्या मिळून आले. त्यानंतर सदर पथकाने वाहनातील व्यक्तींची चौकशी केली असता ते गोंधळून गेले. त्यानंतर पोउपनि श्री. मिलन कुरकुटे यांनी पोलीस स्टेशन अहेरी येथून एक पथक मागविले व सदर इसमांची चौकशी व गाडीची तपासणी केली असता त्यामध्ये ७५ लाख रोकड व नक्षल पत्रके मिळून आले. सदर गाडीतून पहाडीया तुळशीराम तांपला (३५ वर्ष), रवि मलय्या तनकम (४५ वर्ष), नागराज समय्या पुट्टा (३७ वर्ष), या तिघांना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीची चौकशी केली असता ते तेंदूपत्ता ठेकेदार असून असल्याची त्यांनी माहिती दिली. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या नक्षल पत्रकांबाबत चौकशी केली असता सदरची रक्कम ही नक्षल्यांना देणार असल्याची बाब अटक आरोपींनी कबूल केली आहे. आरोपीतांविरूध्द पोस्टे अहेरी येथे यु.ए.पी.ए. कायदयांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक आरोंपीना आज न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक २८/०५/२०१७ पर्यंत पीसीआर देण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. गजानन टोम्पे करीत आहेत.